# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३८ /२०२५ दि. १५/०३/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १७/०३/२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने दुपारी १५:०० वा. नंतर स्व. इंदिरा चौक, डोंबिवली पुर्व परीसरातुन शिवसेना पक्षाचे वतीने मिरवणुक काढण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे ठिकाणी मोठया संखेने नागरीक, महिला व युवक तसेच विविध मंडळ, संस्था उपस्थित राहणार असुन सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** मिरवणुक टिळक चौक येथे आले नंतर कल्याण रोडवरील टिळक चौक डोबिंवली पुर्व येथुन घरडा सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **"टिळक चौक"** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व वाहने टिळक चौक ते घरडा सर्कल पर्यंत **घरडा सर्कल ते टिळक चौक** या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** मिरवणुक मदन ठाकरे चौक येथे आले नंतर टिळक रोडने मदन ठाकरे चौक कडे जाणाऱ्या वाहनांना **'सर्वेश हॉल/ताई पिंगळे चौक'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने डावे वळण घेवुन **भगतसिंग रोडने** इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** मिरवणुक सर्वेश हॉल येथे आले नंतर टिळक चौकाकडुन सर्वेश हॉल कडे येणाऱ्या वाहनांना **'टिळक चौक'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व वाहने डावे वळण घेवुन व्ही. पी. रोडने **चार रस्ता पाटणकर चौक** मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** मानपाडा रोड चार रस्ता/पाटणकर चौक कडुन स्व. इंदिरा चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **'ग्रीन चौक'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने डावे वळण घेवुन **चिपळुणकर रोड** मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** घरडा सर्कल डोबिंवली पुर्व येथुन कल्याण रोडने टिळक चौक कडे येणा–या के.डी.एम.टी, एन.एन.एम.टी., खाजगी बसेस व अवजड वाहनांकरिता **'घरडा सर्कल'** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व वाहने घरडा सर्कल येथे यु टर्न घेवुन इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. १७/०३/२०२५ रोजी दुपारी **१५:०० वा. ते रात्रौ २३:०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner




Scanned with OKEN Scanner
CamScanner